# प्रशासक नियुक्ती

क्रमांक अमाशा ३४९८
शिक्षण संचालनालय महाराष्ट्र राज्य पुणे १
दिनांक १८.९.१९९८

प्रति,

सर्व विभागीय शिक्षण उपसंचालक , महाराष्ट्र राज्य

**विषय : शाळांचे व्यवस्थापन ताब्यात घेऊन प्रशासक नियुक्त करण्याबाबतचा चौकशी अहवाल**

राज्यातील खाजगी मान्यताप्राप्त प्राथमिक/ माध्यमिक शाळांच्या गैरव्यवस्थापनाबाबत शासनाकडे तथा शिक्षण संचालनालयाकडे वेळोवेळी लोकप्रतिनिधी शिक्षक संघटना इत्यादींकडून तक्रारी प्राप्त होतात अशा शाळाचे व्यवस्थापन ताब्यात घेऊन प्रशासक नियुक्त करण्याबाबत मागणी केली जाते. महाराष्ट्र शैक्षणिक धोरण व्यवस्थापन अधिनियम १९७० मधील कलम ३ अनुसार अशा गैरव्यवस्थापन असलेल्या शाळांचे व्यवस्थापन ताब्यात घेऊन कलम ४ अनुसार प्रशासक नियुक्त करण्याबबतची कार्यवाही शिक्षण संचालक यांच्याकडून केली जाते. तथापि अशी कार्यवाही करण्यापूर्वी क्षेत्रीय अधिका-यांकडून सखोल चौकशी अहवाल अभिप्रायासह प्राप्त करुन घेतला जातो. चौकशी अहवालाचे आधारे संबंधित व्यवस्थ्ंापनास कारणे दाखवा नोटीस दिली जाते. कारणे दाखवा नोटीमध्ये गैरव्यवस्थ्ंापनाच्या प्रमुख बाबीसंबंधीचे तपशीलासह उल्लेख नसल्यास प्रशासक नियुक्तीबाबतचा निर्णय घेणे अडचणीचे होते त्यामुळे प्रशासक नियुक्तीबाबतचा चौकशी अहवाल वस्तुनिष्ठ व परिपूर्ण असणे आवश्यक आहे संचालनालयाकडे प्राप्त होणारे असे चौकशी अहवाल पाहिले असता ते परिपूर्ण नसल्याचे निदर्शनास आले आहे त्यामुळे संचालनालयाकडून पुन्हा संदर्भ करुन आवश्यक ती माहिती घ्यावी लागते त्यामुळे विनाकारण कालापव्यय होतो व असे होऊ नये म्हणून शिक्षणाधिकारी यांचेकडून खालील मुददे विचारात घेऊन चौकशी अहवाल प्राप्त करुन सदर चौकशी अहवाल अभिप्रायासह शिक्षण संचालनालयास सादर केला जातो.

**<u>चौकशी अहवाल मुददे</u>**

१. संस्था अंतर्गत वाद व त्याचा शालेय प्रशासनावर परिणाम धर्मादाय आयुक्त/ न्यायालय प्रकरणे
२. शाळा समिती कामकाजातील अनियमितपणा
३. वार्षिक गैरव्यवहार व त्याचा शालेय प्रशासनावर परिणाम
४. वेतनेतर अनुदानाचे निर्धारणतथा अनुदान विनियोगातील अनियमितपणा त्याचा शाळेच्या दैनंदिन कामकाजावर परिणाम
५. खालावलेला शैक्षणिक दर्जा व विद्यार्थी संख्येवर झालेला परिणाम ३ वर्षाचे माध्यमिक शालांत परिक्षा निकाल व विदयार्थी संख्या
६. कर्मचारी सेवा शती भंग विषयक प्रकरणे उदा रिक्त पदे वेळीच न भरणे नियमबाहय नियुक्त्या करणे अनावश्यक बदल्या/ पदोन्नत्या गैरपर्तणूक करणा-या कर्मचा-यांवर शिस्तभंग विषयक कार्यवाही न करणे, कर्मचा-यांनी न्यायालयीन/लोकआयुक्त प्रकरणे, कर्मचा-याचे वेतन नियमानुसार वेळीच न करणे, सेवा अभिलेख/ गोपनीय अहवाल इत्यादीबाबत नियमानुसार पुर्तता न करणे इत्यादी
७. मुख्याध्यापक/ कर्मचारी यांचेवरील नियंत्रणाचा अभाव व त्यामुळे शैक्षणिक व प्रशासकीय बाबींवर झालेला परिणाम
८. संस्था/ शाळेबाबत तक्रारी व त्याबाबतची वस्तुस्थिती अभिप्रायासह
९. शैक्षणिक/ भौतिक सुविधांचा अभाव, शैक्षणिक नियोजनाचा अभाव उदाः अपुरी व अयोग्य शालेय इमारत पुरेशा क्रीडांगणाचा अभाव वर्गखोल्यांचे आकारमान नियमानुसार नसणे पुरेसे फर्निचर/ शैक्षणिक साहित्य नसणे, ग्रंथालय/ प्रयोगशाळा अभाव अपुरेपणा इत्यादी
१०. शालेय अभिलेखाची स्थिती/ अनियमितपणा, विद्यार्थी प्रवेश/ वर्गोन्नतीबाबत अनियमितपणा
११. शिक्षक पालक संघाचे कार्य तथा कामकाज इत्यादी

उपरोक्त मुददे मार्गदर्शनास्तव असून शिवाय आणखी काही मुददे तपासणी अधिका-यांच्या निदर्शनास आल्यास त्याचाही समावेश चौकशी अहवालात करावा. सदर

चौकशी उपशिक्षणाधिकारी अथवा गटशिक्षणाधिकारी यांनी अथवा शिक्षणाधिकारी यांनीच करावी.

संचालनालयाकडून चौकशी करण्याबाबतचे पत्र प्राप्त झाल्यापासून १५ दिवसात चौकशी करुन शिक्षणाधिकारी यांनी आपला अहवाल विभागीय शिक्षण उपसंचालक यांना सादर करावा लागतो. विभागीय शिक्षण उपसंचालकांनी सदर अहवालाची छाननी करुन आठ दिवसात शिक्षण संचालनालयास सादर करावा .या प्रकरणी चौकशी अहवाल सादर करण्याबाबतची कालमर्यादा काटेकोरपणे पाळावी.

उपरोक्त प्रमाणे यापुढे न चुकता कार्यवाही होईल असे पहावे.

स्वाक्षरी/ शिक्षण संचालकांकरिता

प्रत : मा. सचिव, शालेय शिक्षण विभाग, मंत्रालय, विस्तार भवन,मुंबई-३२. यांना माहितीस्तव सादर.

प्रत : शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांना माहिती व सत्वर त्या कार्यवाहीस्तव अग्रेषित.

प्रत : शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांना माहितीस्तव अग्रेषित.